www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ ठाणे रेल्वे स्थानकातील स्वच्छतागृहात...

पान ३ वर....

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ नक्षल्यांच्या हालचालींवर ड्रोनची करडी नजर...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## मुंबईवर आजारपणाचं भीषण संकट !

## नागरिकांवर पुन्हा मास्क लावण्याची वेळ..

● मुंबई, यश सावंत :

पावसाची माघार, मध्ये वाढणारं तापमान आणि आता रात्रीसह पहाटेच्या वेळी तापमानात होणारी घट हे संपूर्ण चित्र पाहता हवामानातील या प्रत्येक बदलाचा कमीजास्त स्वरुपात मुंबईतील नागरिकांवर थेट परिणाम होताना दिसत आहे. शहरामध्ये प्रदूषणातही लक्षणीयरित्या वाढ झाल्यामुळं त्याचा परिणामही नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

मागील काही दिवसांचा आढावा घेतल्यास मुंबईत शासकीय दवाखान्यांपासून खासगी रुग्णालयांमध्येही व्हायरल तापाची रुग्णसंख्या मोठ्या फरकानं वाढली आहे. तापाची तीव्रता वाढून किमान सात ते आठ दिवस हे आजारपण मुक्कामी राहत असल्याचं डॉक्टरांचंही म्हणणं असल्यामुळं नागरिकांना आरोग्य जपण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

दैनंदिन जीवनामध्ये नागरिकांना सर्दी, खोकला, ताप,



घशात खवखव यासह अंगदुखी, डोतेदुखी अशा समस्या सतावू लागल्या आहेत. त्यामुळं आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या असून, नागरिकांना पुन्हा एकदा मास्क आणि स्कार्फचा वापर करून नाक, तोंड झाकण्याचा सल्ला दिला जाच आहे. शहरात धुळीचं वाढतं प्रमाण आरोग्याच्या समस्यांमध्ये भर टाकत असल्यामुळं मास्कचा वापर आता पुन्हा एकदा वाढल्यास यात आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. याव्यतिरिक्त नागरिकांना पाणी उकळून पिण्याचा सल्लाही दिला जात आहे.

पान २ वर

## पनवेल मधील असुरक्षित रिक्षा प्रवासाबाबत सर्व पक्षीय नेते गप्प

● पनवेल, भावना जैन :

साडेनऊ लाख लोकसंख्या असलेल्या पनवेल महापालिका क्षेत्रात सुमारे अडीच लाखांहून अधिक प्रवासीवर्ग असला तरी प्रचारादरम्यान प्रवाशांच्या समस्येवर कोणताही राजकीय पक्ष बोलण्यास तयार नाही. त्यामुळे प्रवाशांच्या विविध समस्यांबाबत निवडून येणारा उमेदवार राज्य सरकारच्या माध्यमातून पनवेलकरांसाठी प्रभावी परिवहन व्यवस्था सुरू करण्यासाठी काय प्रयत्न करणार याबाबत प्रचारातून 'शहर परिवहन'चा मुद्दा हद्दपार झाल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

तीन आसनी रिक्षाचालकांची संख्या पनवेलमध्ये सुमारे १२ हजारांहून अधिक आहे. मीटरप्रमाणे पनवेलमध्ये रिक्षा चालवाव्यात यासाठी कोणत्याही राजकीय नेत्यांनी आग्रह धरला नाही. त्याचा भुर्दंड सामान्य प्रवाशांना



भोगावा लागत आहे. ४० टक्क्यांपेक्षा अधिक रिक्षाचालक हे स्थानिक आहेत. त्यामुळे तीन आसनी रिक्षांनी नियमाप्रमाणे व्यवसाय करावा हा मुद्दा उमेदवार उपस्थित करीत नाहीत. दररोजच्या रिक्षाभाड्यातून प्रवाशांची लूट होत असली तरी असुरक्षित प्रवासाशिवाय पनवेलच्या प्रवाशांसमोर पर्याय उरलेला नाही. तीन आसनी रिक्षात पाच प्रवाशांना कोंबून रिक्षाप्रवास राजरोस सुरू आहे. या मुद्द्यावर राजकीय पक्षांचे उमेदवार आणि मतदारांकडूनही प्रश्न विचारले जात नाहीत अशी स्थिती आहे.

पान २ वर

## 'डीएसके' यांच्या गुंतवणूकदारांची यादी सादर करण्याचे मावळ-मुळशी उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना न्यायालयाचे आदेश

● पुणे, अभिजित येरल्लू :

बांधकाम व्यवसाय दीपक सखाराम कुलकर्णी ऊर्फ डीएसके यांच्याकडे गुंतवणूक करणाऱ्या ठेवीदारांची यादी पुढील दोन महिन्यांत सादर करावी, असा आदेश या प्रकरणातील विशेष न्यायालयाने मावळ-मुळशी उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना दिला आहे. या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली आणि न्यायालयात जमा असलेली रक्कम किती आहे हे देखील उघड करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

गुंतवणुकीची मुदत संपल्यानंतर अनेक वर्ष परतावा न मिळाल्याने अनेक ठेवीदारांनी या गुन्ह्यात न्यायालयात



जमा असलेली रक्कम समप्रमाणात परत मिळावी, अशी मागणी केली आहे. याबाबतचा अर्ज ठेवीदारांच्यावतीने ॲड. चंद्रकांत बिडकर यांनी न्यायालयात दाखल केला आहे. त्यावर विशेष न्यायाधीश ए. सी. डागा यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. यासंदर्भात न्यायालयाने दोन महिन्यांत यादी सादर करण्याचा आदेश मावळ-मुळशीचे उपविभागीय दंडाधिकारी सुरेंद्र नवले यांना दिला आहे. हे प्रकरण गुंतागुंतीचे आहे. वस्तुस्थिती लक्षात घेता या दाव्यातील शेकडो प्रलंबित अर्ज निकाली लावणे आवश्यक आहे. ठेवीदार आणि गुंतवणूकदारांनी तयार केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर अशा दाव्याच्या सतत्येबद्दल न्यायालयाला कळवावे, असे आदेशात नमूद आहे.

ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळण्यासाठी डीएसके यांच्या १९५ मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी द्यावी, असा अर्ज मावळ-मुळशीचे उपविभागीय दंडाधिकारी सुरेंद्र नवले यांनी येथील विशेष न्यायालयात केला आहे.

पान २ वर

## "ठाकरेंच्या कुठल्याच व्यक्तीला काही बोलणार नाही, बाळासाहेबांना वचन दिलेल"- नारायण राणे

● सिंधुदुर्ग, दिगंबर जाधव :

सावंतवाडी, कणकवली येथील सभांमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि त्यांच्या मुलांवर टीका केली होती. यापूर्वी सिंधुदूर्गकरांनी गुंडांना बाहेर केले होते, परंतू आता चूकून पुन्हा निवडून दिले आहे. आता मुलांना निवडून दिले तर बाप डोक्यावर आणि मुले खांद्यावर बसतील असे ठाकरे म्हणाले होते. यावरून नारायण राणे काय उत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असताना राणेंनी



यावर जाहीर सभेत बोलणार असल्याचे म्हटले आहे.

भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांची एकजूट हवी, असे काही अनुभव आलेत म्हणून हे सांगत आहे. या मतदारसंघातून मला ६ वेळा निवडून दिले. या भागासाठी अनेक कामे केली आहेत. काल उद्धव ठाकरे आले त्यावर जाहीर सभेत बोलेन. पण आजपर्यंत मी राखून होतो, ठाकरेंच्या कुठल्याच व्यक्तीला मी काही बोलणार नाही, हे मी बाळासाहेबांना त्यावेळी वचन दिले होते, अशी आठवण राणे यांनी करून दिली.

तुझा राग शांत झाला का असे बाळासाहेबांनी बोलवून विचारले होते. तुझ्याकडून मला एक शब्द हवा आहे. माझ्यानंतर काही जरी झाले, उद्धव, आदित्य काही जरी बोलले तरी वाईट विचार करू नकोस. मी साहेबांना म्हटले, उद्धव आदित्य काय कोणत्याही ठाकरेंच्या व्यक्तीला मी काही बोलणार नाही, असा शब्द दिली होता. बाळासाहेबांमुळे हा व्यक्ती वाचत आला आहे, असे राणे म्हणाले.

सिंधुदुर्ग जिल्हा समृद्ध होईल, त्यावेळी आनंद होईल. त्यावेळी सावंतवाडी ते पोलादपूर दरम्यान सर्व आमदार शिवसेनेचे आले म्हणून त्यावेळी कॅबिनेट मला मिळाले होते. आता आरोपांचा योग्य वेळी समाचार घेईन पण येथील तिन्ही जागा ताब्यात घ्या. विरोधकांना ५०-६० हजार मतांनी झोपवायचे आहे.

पान २ वर

## उल्हासनगर महापालिकेला बॅनर्स-पोस्टर्स परवानगीतून मिळाले, १४ लाख ७५ हजाराचे उत्पन्न

● उल्हासनगर, सतीश सोनावणे :



महापालिकेला निवडणूक निमित्त पोस्टर्स व बॅनर्सच्या परवानगीतून १४ लाख ५० हजार, ९०६ रुपयाचे उत्पन्न मिळाले आहे. आजपर्यंत एकूण २४५ पोस्टर्स व बॅनर्सला परवानगी मिळाल्याची माहिती आयुक्त विकास ढाकणे यांनी दिली. उल्हासनगर महापालिकेने निवडणूक निमित्त आजपर्यंत एकूण २४५ पोस्टर्स व बॅनरला परवानगी दिली. यामध्ये मालमत्ता विभागाबने दिलेल्या परवानगीची संख्या १०६ आहे. तर बाजार व परवाना विभागाकडून एकूण १३९ अर्जांना परवानगी दिली. पोस्टर्स परवानगी मधून महापालिकेला एकूण १४ लाख ५० हजार ९०६ रुपये उत्पन्न मिळाल्याची माहिती महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांनी दिली.प्रत्यक्षात शहरात लावण्यात आलेल्या अनेक पोस्टर्स व बॅनर्सवर महापालिका परवानगी क्रमांक लिहले नसल्याची चर्चा आहे. विनपरवाना लावलेल्या पोस्टर्स व बॅनर्सवर कारवाई करण्याची मागणी नागरिक व सामाजिक संघटनेकडून होत आहे.

## ..तर वडिलांच्या संपत्तीवर मुलींचा हक्क नाही; मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी एका खटल्याची सुनावणी करताना, हिंदू उत्तराधिकार कायदा १९५६ लागू होण्यापूर्वी वडिलांचा मृत्यू झाला असल्यास मुलींना वडिलांच्या संपत्तीवर अधिकार नसल्याचा निर्णय दिला. न्यायमूर्ती एएस चांदूरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने २००७ पासून प्रलंबित असलेल्या एका प्रकरणात हा निकाल दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, १९५६ चा कायदा लागू होण्यापूर्वी त्या व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याने त्याच्या मृत्यूच्या वेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार त्याच्या मालमत्तेचे वाटप करण्यात आले आणि त्यावेळी मुलींना वारस म्हणून मान्यता देण्यात



आलेली नव्हती.

मुंबई येथे यशवंतराव या व्यक्तीचा १९५२ मध्ये मृत्यू झाला. १९३० मध्ये त्यांची पहिली पत्नी लक्ष्मीबाईच्या मृत्यूनंतर, यशवंतराव यांनी भिकूबाई यांच्याशी पुनर्विवाह केला, ज्यांच्यापासून त्यांना चंपूबाई ही मुलगी होती. काही वर्षांनंतर त्यांच्या पहिल्या पत्नीची मुलगी राधाबाई हिने तिच्या वडिलांच्या अर्ध्या संपत्तीवर दावा केला. हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६ आणि २००५ मध्ये झालेल्या सुधारणा कायद्यानुसार तिच्या वडिलांच्या संपत्तीवर उत्तराधिकाराचा हक्क मिळावा, असा तिने दावा दाखल केला. ट्रायल कोर्टाने त्यांचा दावा फेटाळला होता. न्यायालयाने म्हटले होते की, हिंदू महिला संपत्ती हक्क कायदा १९३७ अंतर्गत यशवंतराव यांची संपत्ती फक्त भिकूबाईनाच मिळाली होती आणि हिंदू उत्तराधिकार कायद्यानुसार १९५६ मध्ये ती त्याची वारस बनली होती.

मुंबई उच्च न्यायालयाने १९५६ पूर्वीच्या कायद्यांच्या संदर्भात उत्तराधिकार अधिकारांचा विचार करण्याची गरज व्यक्त केली. खंडपीठाने म्हटले की, १९५६ पूर्वी ज्या मुलीची आई विधवा होती आणि तिचे दुसरे नातेवाईक नव्हते अशा मुलीला उत्तराधिकारी असतील की नाही हे ठरवण्यासाठी आम्हाला पाठिमागे जावे लागेल.

पान २ वर

## रायगडमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून १ कोटींचा मुद्देमाल जप्त

● रायगड, विशाल पाटील :



विधानसभा निवडणूक सन २०२४ च्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत एकूण ३२४ गुन्हे नोंदविण्यात आलेले असून २४० आरोपीना अटक करण्यात आली आहे. संपूर्ण कारवाईमध्ये १ लाख ५८ हजार ५३१ लि.दारु जप्त करण्यात आली असून एकूण जप्त मुद्देमालाची किंमत १ कोटी १ लाख ९० हजार ४९७ आहे.

पान २

## 'चर्चा होते तो मुख्यमंत्री होतोच असं नाही, पण काही., ' -विनोद तावडे

● नागपूर, नितीन देवळेकर :

येत्या २० नोव्हेंबरला महाराष्ट्रात विधानसभा निवडणूकांसाठी मतदान होत आहे. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार की महाआघाडीचे सरकार येणार यावर चर्चा सुरु आहे. अलिकडे आलेल्या सर्वेमध्ये महायुतीचे सरकार येणार असे आकडे दाखविलेले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातून केंद्रात रमलेले भाजपाचे नेते विनोद तावडे यांनी टीव्ही ९ मराठीला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी राज्यात पुन्हा महायुतीला बहुमत मिळणार असे म्हटले आहे. त्यांनी पुन्हा महाराष्ट्रात येणार की नाही यावर देखील भाष्य केले आहे.

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी यावेळी सांगितले की भाजपमध्ये ज्या गोष्टीची चर्चा असते ते शंभर टक्के होतेच असे नाहीच.



राजस्थानमध्ये पाहा, भजनलाल मुख्यमंत्री झाले. त्यांचं नाव चर्चेच नव्हतं. मोहन यादव मध्यप्रदेशात. इतर राज्यातही असंच आहे. चर्चा होते ते मुख्यमंत्री होतातच असं नाही. पण काही अपवादही असतात असेही तावडे यावेळी म्हणाले.

आपल्याला आता राष्ट्रीय स्तरावर काम करताना आनंद मिळतोय.

पान २ वर

## ईव्हीएममध्ये गडबड असल्याबाबत परदेशी माणसाचा फोन येतोय; सुप्रिया सुळेंच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

● नाशिक, सचिन कदम :

राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याने चर्चेला उधाण आलं आहे.

परदेशी माणसाचा फोन येतोय, ताई मशीनमध्ये गडबड आहे असं सांगत आहे. बाबतची माहिती आपण निवडणूक आयोगाला देणार असल्याचं सुळेंनी यावेळी सांगितलं आहे. त्याचबरोबर कोणत्याही पक्षाचा किंवा विरोधातील उमेदवाराची फसवणूक होऊ नये, असंही



सुप्रिया सुळे यावेळी म्हणाल्या आहेत.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, परदेशी माणसाचा फोन येतोय, ताई मशीनमध्ये गडबड आहे असं सांगत आहे. १७० सीट कसे निवडून येणार? काही मशीनमध्ये गडबड आहे, निवडणूक प्रक्रियेवर विश्वास आहे . भगरे सरांना, मला निवडून दिले त्यामुळे मला विश्वास आहे. साताऱ्यात पिपाणी आणि तुतारीत गडबड झाली नसती तर शशिकांत शिंदे निवडून आले असते हे मी म्हणत नाही ते म्हणत आहे. देवेंद्र फडणवीस चांगला माणूस पण कॉपी करून पास झाला. दोन पक्ष फोडून उपमुख्यमंत्री झाले असे देवा भाऊ म्हणतात. साताऱ्यात पिपाणी नसती तर सीट गेली असती असे त्यांचे सहकारी म्हणत आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, शेतकऱ्यांच्या मेहनतीवर हा देश उभा आहे. अन्न दात्याला जो दुखवेल तो सत्तेत बसू शकणार नाही. सोयाबीन आणि कापसाचे पीक आले पण हमीभाव मिळत नाही. भाषण करतांना माझ्या अंगावर काटा येतोय. सोयाबीन आणि कापसाला ७ ते १० हजार क्विंटल हमीभाव देणार कारण आमचे ते कर्तव्य आहे.

महाविकास आघाडीचे ३२ यायला पाहिजे होती. या राज्यात सगळ्यात जास्त लाडकी बहीण मी आहे. लोकसभेत मी लाडकी नव्हते, नंतर दणका बसल्यावर मी लाडकी झाले. १५०० देऊन लाडकी होत नाही, बहिणींवर प्रेम करून बघा. आमच्या नात्याची १५०० रुपये किंमत लावली. मागितले असते तर सगळं देऊन टाकले असते असे देखील सुप्रिया सुळे म्हणाले.

सुप्रिया सुळे म्हणाले, ८४ वर्षाचा माणूस फिरत आहे.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# राज्यातील हवामान कृती कक्ष कसा करणार हवामान बदलांचा सामना?

हवामानसाठी सर्वाधिक धोकादायक असलेल्या जगातील ५० राज्यांच्या यादीत महाराष्ट्र नवव्या क्रमांकावर आहे. राज्यातील हवामान, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी एकसंध प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत, ते कसे?

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाने २५ जुलै २०२४ रोजी प्रकाशित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील ४३ अमृत शहरे, ३६ जिल्हे, आणि सहा महसूल विभागांमध्ये 'हवामान कृती कक्ष' स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शासनस्तरावर तळागाळापर्यंत हवामान बदलांवर उपाययोजनांच्या दृष्टीने सुरू करण्यात आलेला हा उपक्रम देशातील अशा प्रकारची पहिलीच सर्वसमावेशक हवामान शासन (क्लाइमेट गव्हर्नन्स) प्रणाली आहे जी राज्यस्तरावर हवामान बदलांना तोंड देण्यासाठी एकसंध प्रयत्न करते.


हवामानसाठी सर्वाधिक धोकादायक असलेल्या जगातील ५० राज्यांच्या यादीत महाराष्ट्र नवव्या क्रमांकावर आहे. यासोबतच महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी ११ जिल्हे तीव्र हवामान बदलांचा फटका, दुष्काळ आणि पाण्याच्या पातळीतील घट यांमुळे मोठ्या प्रमाणात त्रस्त आहेत. वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा, सततचा दुष्काळ, पावसाची अनिश्चितता, पूर, भूस्खलन, समुद्राच्या पाण्याची वाढती पातळी आणि चक्रीवादळे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींची वाढती तीव्रता व प्रमाण यामुळे राज्यातील समस्या वाढत आहेत. हवामान बदलांमुळे आर्थिक हानी, पिकांचे आणि मालमत्तेचे नुकसान यांसारखे परिणाम सर्वदूर अनुभवास येत आहेत.

पॅरीस करारामधील सहभागींपैकी एक देश म्हणून भारत अद्ययावत राष्ट्रीय निर्धारित योगदान (एनडीसी) व त्याचे २०७० पर्यंत नेट झिरो हे दीर्घकालीन ध्येय साध्य करण्यासाठी कटिबद्ध आहे. हवामान बदलासाठीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याच्या अनुषंगाने प्रगतीपथावर असलेले महाराष्ट्र राज्य हवामान बदलावरील कृती आराखड्याच्या दृष्टीने आणि कृतीत मार्ग काढण्यासाठी महत्त्वाचे आहे. शहरी वस्त्यांमध्ये परिवहन, ऊर्जा तसेच बांधकाम व कचरा व्यवस्थेमुळे बऱ्याच प्रमाणात हरितगृह वायूची निर्मिती होते. यासोबतच उष्णता, पावसाची अनिश्चितता, वायू प्रदुषण व भूजल पातळीतील घट यांसारख्या हवामान बदलाच्या धोक्यांना शहरे बळी पडतात. शहर व जिल्हा पातळीवर विकास योजनांमध्ये वातावरणीय कृतीचा अंतर्भाव करणारी शासकीय रचना निर्माण करून राज्याच्या नेट झिरो ध्येयांसोबत सैरेखित होण्यासाठी समन्वयित प्रयत्न व मालकीसाठीची चौकट उपलब्ध करून देण्याचे काम वातावरणीय कृती कक्ष करते.

शासकीय ठरावानुसार, पर्यावरण व हवामान धोरण सुधारणा, अवलंबन व सहयोग आणि नियंत्रण व मूल्यमापन या तीन स्तंभांवर आधारित वातावरणीय कृती कक्षांची स्थापना करण्याचे आदेश आहेत. पर्यावरण व हवामान धोरण विकास यामध्ये शहर व जिल्हा स्तरावर कृती आराखडा विकसित करण्यात येत आहे. मुंबई, सोलापूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांच्यासाठी तयार केलेला हा कृती आराखडा सर्वसमावेशक दस्तऐवज तयार करण्याच्या प्रक्रियेचा अग्रक्रम निर्धारित करण्यासाठी उपयुक्त ठरेल. अंमलबजावणी व सहयोगः हवामान कृती आराखड्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी ही संबंधित हवामान कृती कक्षांची असेल. हे कक्ष राज्य हवामान कृती योजना, बांधकाम व ऊर्जा क्षेत्रातील निष्कार्बनीकरणाचे (डिकार्बनिजेशन) वेळापत्रक, हरीत महाराष्ट्र वृक्षारोपण अभियान आणि 'माझी वसुंधरा अभियान' राबवण्यासाठीदेखील जबाबदार असतील. यासोबतच हे कक्ष विविध विभाग व शासनमान्य संस्था यांच्यामधील संपर्क बिंदू म्हणून समन्वय व डेटा पुरविण्याचे काम करतील. संबंधित तांत्रिक व संशोधन संस्थांसोबत सहयोग हे माहिती व्यवस्थापन, प्रसार आणि नेटवर्किंगसाठीचे सूत्र असेल.

देखरेख व मूल्यमापनः अबाधित पर्यवेक्षणाची खात्री करण्यासाठी शहर व जिल्हास्तरीय कक्षांना महिन्यातून एकदा भेटणे बंधनकारक आहे, तर विभागीय कक्ष त्रैमासिक आढावा घेतील. शहर व जिल्हा हवामान कृती कक्षांनी जबाबदारीचे भान राखून त्यांना दिलेल्या देखरेख व मूल्यमापन चौकटीवर आधारित स्वरूपातील अपडेट नियमितपणे विभागीय व राज्य हवामान कृती कक्षांना देणे आवश्यक आहे. शहर हवामान कृती कक्षामध्ये १५ सदस्य असतील ज्यामध्ये परिवहन, पाणी पुरवठा व स्वच्छता, घन कचरा व्यवस्थापन, बांधकाम परवानगी, नगर रचना, उद्यान, आरोग्य आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असेल. या समितीचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त किंवा नगर परिषदेचे मुख्य अधिकारी, तसेच सदस्य सचिव म्हणून उपायुक्त (पर्यावरण) / पर्यावरण अधिकारी नियुक्त असतील.


## आजची चित्रोळी



काळ झोपतां पाय पसरूनी,
भीती मग कोणा नसतें !
श्वास मोकळा क्षणभर घेऊनी,
जीवसृष्टी मनीं हसतें !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# जननायक बिरसा मुंडा



आज १५ ,नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार

# गुरू नानक देव



आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरू नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धर्माचे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते. गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या. या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धर्माचे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

## पान १ वरून...

### ईव्हीएममध्ये गडबड असल्याबाबत...

काल रात्री भांडण झाले, ७ सभा झाल्या. मुख्यमंत्री पद नको, सत्ता नको फक्त चांगलं सरकार येऊ दे यासाठी ते फिरत आहे. माझी सगळयात मोठी लढाई भाजपसोबत आहे. कांद्यावरून ती लढाई झाला. पियुष गोयल यांच्यासोबत भांडण झाले. कांदा नाफेड आणि एनसीसीएफमध्ये भ्रष्टाचार सुरू आहे.

कुणी बोललं तर डोळयात पाणी येत, घात झाला तर तीच महिला पदर खोचून झाशीची राणी होते. निवडणूक झाल्यावर कांद्याच्या भ्रष्टाचाराठी भगरे सर आणि मी आमरण उपोषणाला बसणार आहे. इमानदार असणे मोठी पदवी झाली आहे. शेतकऱ्यांना आणि महिलांना आपण आधार देणार आहे. पैसे देऊन मतदान करा असे उद्योग आम्ही करणार नाही, असे देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या.

### 'चर्चा होते तो मुख्यमंत्री होतोच असं नाही,...

मी २० वर्ष आमदार होतो. पाच वर्ष ९ खात्याचा मंत्री होतो. अशी नऊ खाती की आधीच्या सरकारमध्ये ९ जण सांभाळत होते. नंतर परत आठ जण सांभाळत होती. अशी नऊ खाती मी एकत्रपणे सांभाळली आहेत. आता राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळते त्याचा आनंद आहे. दिल्लीत राहावं राष्ट्रीय पातळीवरचं राजकारण करावं वाटतं. ओन्ली राष्ट्र, नो महाराष्ट्र असे पुन्हा एकदा विनोद तावडे यांनी ठामपणे सांगितले आहे.

भाजपही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात लढत आहे. मात्र, महायुतीचं नेतृत्व एकनाथ शिंदे करत आहे. मुख्यमंत्री कोण काय हे निवडणुकीनंतर ठरवलं जाईल असेही विनोद तावडे यांनी सांगितले. फडणवीस, शिंदे आणि अजितदादा यांचे पुढे काय करायचं त्यांच्यावर कोणती जबाबदारी द्यायची हे केंद्रीय नेतृत्व ठरतील असेही तावडे यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाबाबत बोलताना विनोद तावडे म्हणाले की महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची चर्चा निवडणुकीनंतर करू असं पक्षाने ठरवलं आहे. संख्याबळावर मुख्यमंत्री ठरणार नाही. निवडणुकीनंतर बसून ठरवू. ज्याचे आमदार जास्त तो होईल असेही तावडे यांनी सांगितले. बिहारमध्ये आम्ही नितीश कुमार केले. आमचे आमदार जास्त पण नितीश कुमार मुख्यमंत्री झाले. पण त्या त्या वेळच्या राजकीय परिस्थितीवर लक्षात घेऊन करावं लागेल. महाराष्ट्राच्या हिताचं पाहून निर्णय घ्यावा लागेल असेही तावडे यांनी सांगितले.

### ..तर वडिलांच्या संपत्तीवर मुलींचा हक्क...

न्यायालयाने म्हटले की हिंदू महिला संपत्ती हक्क कायदा, १९३७ मुलींना उत्तराधिकार प्रदान करत नाही, कारण त्यात स्पष्टपणे फक्त मुलांचा उल्लेख आहे. जर कायद्याचा हेतू मुलींचा समावेश असेल तर तो स्पष्टपणे झाला असता, असेही न्यायालयाने नमूद केले. खंडपीठाने म्हटले की १९५६ चा हिंदू उत्तराधिकार कायदा, ज्यात मुलींचा प्रथम श्रेणीतील वारस म्हणून समावेश आहे, तो कायदा पूर्वलक्षीपणे लागू होत नाही.

### "ठाकरेंच्या कुठल्याच व्यक्तीला काही...

या उद्धव ठाकरे यांनी एक तरी शाळा, हॉस्पिटल बांधले का? असा सवाल राणे यांनी केला.

या सभेला उदय सामंतही उपस्थित होते. मुंबईत सिंधुरत्न येथे आपल्या पदाधिकाऱ्यांना घर दिले, आज त्यातील अनेक जण नारायण राणे यांना सोडून गेले, तरीही राणेंचा दबदबा कायम असल्याचे सामंत म्हणाले. काल परवा जे येऊन गेले त्यांच्या कॉर्नर सभा होतायत. राणे कुटुंब चिडले पाहिजे म्हणून मुद्दाम उबाठा सेनेचे लोक फिरत आहेत, अशी टीका सामंत यांनी केली.

### 'डीएसके' यांच्या गुंतवणूकदारांची यादी...

सध्याच्या बाजार मूल्यानुसार या सर्व मालमत्तांची किमत ५७२ कोटी १२ लाख ९५ हजार ६० रुपये आहे. या गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तांपैकी ज्या मालमत्तांवर कोणतीही बँक, शासकीय आणि निमशासकीय संस्था कंपनीची हरकत नाही, अशा मालमत्तांची चालू बाजारभावाप्रमाणे असलेल्या मूल्यांचा तक्ता नोंदणी महानिरीक्षकांकडून तत्कालीन विशेष न्यायाधीश जयंत राजे यांच्या न्यायालयात सादर करण्यात आला आहे. या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही.

### असुरक्षित रिक्षाप्रवासाबाबत पनवेलमधील...

१५ वर्षांपासून आ. प्रशांत ठाकूर हे पनवेल विधानसभेचे नेतृत्व राज्याच्या विधिमंडळात करत असल्याने ठाकूर यांनी पनवेल शहराची परिवहन व्यवस्था बळकट करण्यासाठी काय केले असा प्रश्न सामान्य मतदारांकडून विचारला जात आहे. सध्या पनवेलचे हजारो प्रवासी हार्बर रेल्वे तसेच नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रम सेवेची बससेवा (एनएमएमटी) आणि मुंबई महापालिकेची बेस्ट तसेच राज्य परिवहन महामंडळाची (एसटी) या सार्वजनिक बससेवेवर अवलंबून आहेत. परंतु पनवेल पालिकेची स्थापना होऊन आठ वर्षे उलटल्यानंतरही पालिकेची स्वतःची बससेवा सुरू होऊ शकली नाही.

### मुंबईवर आजारपणाचं भीषण संकट !...

ताप अधिक दिवस राहिल्यानं अनेकांमध्येच डेंगी, मलेरिया आणि इतर समस्याही डोकं वर काढताना दिसत आहेत. लहान मुलं आणि वृद्धांना या आजारपणाचा अधिक झोका असल्यामुळं आरोग्याची अधिक काळजी घेत उघड्यावरील अन्नपदार्थ न खाण्याचा सल्लाही आरोग्य यंत्रणा देत आहेत. आकडेवारीनुसार म्हणावं तर, मुंबई शहरात मागील काही दिवसांत रुग्णांमध्ये ३० टक्क्यांनी वाढ झाली असून, सर्दी, खोकला आणि तापाचं प्रमाण येत्या काही दिवसांत आणखी वाढून त्यानंतर हा आलेख शमेल असा अंदाज आहे.

### रायगडमध्ये राज्य उत्पादन शुल्क...

विधानसभा निवडणुक-२०२४आचारसंहिता कालावधीत या विभागाची सात पथक तैनात असून पथकांकडून आंतरराजीय मद्य तस्करी होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. जिल्हयात बेकायदेशीर हातभट्टी दारु निर्मिती व विक्री केंद्र यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. तसेच कोणत्याही प्रकारची अवैध मद्य वाहतूक होणार नाही याकरीता रायगड विधानसभा मतदारसंघात शेडूंग, ता. पनवेल व चांढवे, ता. पोलादपूर येथे २ तपासणी नाके उभारण्यात आले असून तेथे संशयित वाहनांची सखोल तपासणी करण्यात येत आहे. तसेच अवैध मद्यविक्री करणारे ढाबे, हॉटेल, टपऱ्या यांच्यावर वारंवार कारवाई करण्यात येत असून अशा हॉटेल, ढाबे मालक-चालक यांच्यासह जागा मालकांवर गुन्हे नोंद करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच या निवडणूक कालावधीत गोवा राज्यातून गोवानिर्मित मद्याची चोरटी वाहतूक रेल्वे प्रशासनाच्या रो-रो सेवेव्दारे वाहतूक होण्याची शक्यता असल्याने कोलाड येथे रो-रो रेल्वे सेवेव्दारे येणाऱ्या वाहनांची पोलीस विभाग व रेल्वे प्रशासन यांच्याशी समन्वय साधून तपासणी करण्यात येत आहे. विधानसभा निवडणूक २०२४ मुक्त व निर्भयपणे पार पाडावी याकरीता विधानसभा मतदारसंघात मतदारांना दारुचे प्रलोभन देत असल्याचे निदर्शनांस आल्यास तसेच अवैध मद्य निर्मिती व विक्रीबाबत काही तक्रारी असल्यास या विभागाचा व्हॉटस प क्रमांक ८४२२००११३३ व टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ वर संपर्क संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक रविकिरण कोले यांनी केले आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ठाणे महापालिका मुख्यालयात घेण्यात आली मतदानाचा हक्क बजावण्याची सामूहिक शपथ

## मतदानाचा हक्क बजावण्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आवाहन

**ठाणे (रोहित जैसवार) :** मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी, आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी नाविन्यपूर्ण आणि प्रभावी मतदार जागृती धोरण राबविण्याच्या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, ठाणे जिल्ह्याने मतदारांचा सहभाग आणि नागरी सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला आहे. या स्वीप कार्यक्रमांतर्गत, गुरूवार, १४ नोव्हेंबर रोजी ठाणे महापालिका मुख्यालयात मतदानाचा हक्क बजावण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी महापालिका कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना शपथ दिली.

ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या सामुहिक शपथ उपक्रमाचे, ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजन करण्यात आले होते. त्यात उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर आदी उपस्थित होते.









**स्वाक्षरी फलकाचे उद्घाटन**

त्याचबरोबर, स्वीप कार्यक्रमांतर्गत, मतदार जागृतीसाठी ठाणे महापालिका मुख्यालय तसेच प्रभाग समिती कार्यालय येथे 'मी मतदान करणार' हा फलक ठेवण्यात आला आहे. त्यावर स्वाक्षरी करून नागरिकांनी मतदानाबद्दलची ग्वाही द्यावी, अशी या फलकामागची संकल्पना आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या फलकावर स्वाक्षरी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे स्वाक्षरी केली. त्यानंतर, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त अनघा कदम आदींनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. हा फलक महापालिका मुख्यालयात तळमजल्यावर दर्शनी भागात ठेवण्यात आला असून त्यावर नागरिकांनी सही करावी असे आवाहन महापालिकेने केले आहे.

नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करावे, त्याचबरोबर, निवडणुकीच्या कामावर तैनात असलेल्या महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांनीही पोस्टल मतदानाच्या सुविधेचा लाभ घेऊन मतदानाचे कर्तव्य पूर्ण करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

## मतदानपूर्व आणि मतदान दिवशीच्या वृत्तपत्रातील जाहिरातींना 'एमसीएमसी'चे प्रमाणिकरण बंधनकारक

**पालघर (सुचिता देशमुख) -** कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या २० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व-प्रमाणित केली जात नाही, तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करु नये. भारत निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असे आदेश राज्याचे अवर सचिव व उपमुख्य निवडणूक अधिकारी शरद दळवी यांनी दिले आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसापूर्वी प्रिंट माध्यमांमधून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये. ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खिळ बसेल अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत याबाबत दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे कोणताही राजकीय पक्ष किंवा निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या २० नोव्हेंबर २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रिंट माध्यमांमध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हास्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व-प्रमाणित केली जात नाही.

## ठाणे रेल्वे स्थानकातील स्वच्छतागृहात लुबाडणूक

**ठाणे (विशाल कारंडे) :** दररोज पाच लाख प्रवाशांची ये-जा असलेल्या ठाणे रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सुविधेसाठी स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात आली आहे. या स्वच्छतागृहात मुतारीसाठी कोणतेही शुल्क नसताना प्रत्येक प्रवाशाकडून मुतारीच्या वापरासाठी दोन रुपयांची वसूली कंत्राटदाराकडून सुरू आहे. याबाबत प्रवाशांनी विचारणा केल्यास तेथील कर्मचाऱ्यांकडून प्रवाशांना दमदाटी केली जात असून या कंत्राटदारावर कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे प्रवाशांकडून




संताप व्यक्त होत आहे.

ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज सहा ते सात लाख प्रवासी प्रवास करत असतात. मध्य रेल्वे स्थानकातील सर्वाधिक गर्दीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक ठाणे रेल्वे स्थानक आहे. स्थानकात फलाट क्रमांक एक आणि दोन येथे मध्य रेल्वेकडून प्रवाशांसाठी स्वच्छतागृह उभारण्यात आले आहेत. या स्वच्छतागृहाचे कंत्राट दिले आहेत. मुतारी वगळता इतर वापरासाठी स्वच्छतागृहात दर आकारण्यास कंत्राटदाराला परवानगी आहे. असे असतानाही या स्वच्छतागृहांमध्ये प्रत्येक प्रवाशांकडून दोन रुपये आकारले जात असल्याची बाब उघडकीस आली आहे. या बाबत एखाद्या प्रवाशाने जाब विचारल्यानंतर त्यांना स्वच्छतागृहातील कर्मचाऱ्यांकडून दमदाटी केली जाते. या स्वच्छतागृहांचा वापर दिवसाला किमान तीनशे ते चारशे प्रवासी वापर करतात. त्यामुळे स्वच्छतागृहाच्या नावाने प्रवाशांची लुबाडणूक सुरू आहे. तसेच बेकायदेशीररित्या पैसे घेऊन देखील या स्वच्छतागृहाची अवस्था अंत्यत वाईट आहे. काही महिन्यांपूर्वी काही राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवाशांच्या अशा प्रकारच्या लुबाडणूकीबाबत आंदोलने केली होती. परंतु त्यानंतरही असे प्रवास सुरूच आहेत. विशेष म्हणजे, रेल्वे अधिकाऱ्यांचे कक्ष या स्वच्छतागृहापासून हाकेच्या अंतरावर आहे. त्यानंतरही पैसे आकारले जात असल्याने तक्रारी कोणाकडे कराव्यात असा प्रश्न प्रवाशांना निर्माण झाला आहे.

स्वच्छतागृहात नियमाव्यतिरिक्त पैसे घेतले जात असतील किंवा अशी तक्रार आल्यास दोषी कंत्राटदारावर कारवाई करण्यात येईल.

**-पी. डी. पाटील,**
**जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे.**

## मतदान जनजागृतीकरिता संपूर्ण ठाणे जिल्ह्यात एक कोटी नागरिकांनी केला सामूहिक संकल्प

**ठाणे (सचिन कदम) -** मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी नाविन्यपूर्ण आणि प्रभावी मतदार जागृती धोरणांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, ठाणे जिल्ह्याने मतदारांचा सहभाग आणि नागरी सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला आहे.

स्वीप कार्यक्रमांतर्गत सकाळी ११.०० वाजता संपूर्ण ठाणे जिल्ह्यात सुमारे एक कोटी नागरिक एकाच वेळी, आहेत त्या ठिकाणी मतदानाचा हक्क बजावण्याची सामूहिक शपथ घेण्याचा कार्यक्रम जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या आयोजनात ठाणे, नवी मुंबई, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त व इतर सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी, सर्व महानगरपालिकांचे आयुक्त व त्यांचे अधिकारी-कर्मचारी, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी संदिप माळवी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी हर्षल गायकवाड, नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे




अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी विठ्ठल डाके, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी संजय जाधव, उल्हासनगर महानगरपालिकेचे उपायुक्त किशोर गवस, जिल्हा माहिती अधिकारी आणि एकत्रित माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी मनोज शिवाजी सानप, तहसिलदार उज्वला भगत, प्रदीप कुडाळ, स्मिता मोहिते, नायब तहसिलदार स्मितल यादव, जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, ठाणे सिटीझन फाऊंडेशनचे कॅस्बर ऑगस्टिन, विविध अशासकीय संस्था (एनजीओ), शैक्षणिक संस्था आणि स्थानिक संस्था या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेत आहेत.

जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यात जनजागृती करण्यासाठी संपूर्ण ठाणे जिल्ह्यात वाहने, संस्था आणि एजन्सीद्वारे सायरनचा वापर करणे, हे या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य असेल. नियोजित वेळेत सामूहिक संकल्प उपक्रमात सामील होण्यासाठी सायरन नागरिकांना आठवण देण्याचे काम करतील. याशिवाय, शपथेचा मजकूर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे डिजिटल पद्धतीने वितरित केला जाईल, याची खात्री करून प्रत्येक नागरिकाला प्रतिज्ञेमध्ये प्रवेश मिळेल आणि स्थान काहीही असले तरी तो सहभागी होऊ शकेल. तंत्रज्ञानाच्या या वापराचे उद्दिष्ट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे आणि व्यापक सहभाग सुनिश्चित करणे हा आहे. तरी, ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान जनजागृतीकरिता आयोजित या ऐतिहासिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासन आणि स्वीप कक्षाने केले आहे.

## ठाणेकर नागरिकांनी मोठ्या उत्साहात घेतली मतदान करण्याची प्रतिज्ञा

### सामूहिक मतदान प्रतिज्ञा उपक्रमास ठाणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे (राकेश गायकवाड) -** महाराष्ट्रातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मध्ये मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नाविन्यपूर्ण आणि प्रभावी मतदार जागृती धोरणांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आज संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात मतदान करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

मतदारांचा निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यात जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यातील वाहने, संस्था आणि एजन्सीद्वारे सायरनचा वापर करण्यात आला होता. नियोजित वेळेत सामूहिक संकल्प उपक्रमात सामील होण्यासाठी सायरनने शासकीय कार्यालयात, खाजगी आस्थापनांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी असलेल्या नागरिकांना या सामूहिक प्रतिज्ञा उपक्रमात सहभागी होण्याची आठवण करुन दिली. सकाळी 10 वाजून 59 मिनिटांनी सायरन वाजल्यानंतर 11.00 वाजता संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील उत्साही मतदार, नव मतदार विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासह, नवी मुंबई,



मिरा भाईंदर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त व इतर सर्व पोलीस अधिकारी/ कर्मचारी, सर्व महानगरपालिकांचे आयुक्त व त्यांचे अधिकारी-कर्मचारी, ठाणे जिल्हा परिषद कार्यालय व त्यांच्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी सर्व महापालिका शाळा, खाजगी शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीची तसेच मतदान अधिकार बजावण्याची प्रतिज्ञा घेतली.

ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सामूहिक प्रतिज्ञा घेण्याच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 137 भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघात भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात सामूहिक शपथ घेण्यात आली.

## गडकरी रंगायतनच्या नूतनीकरणाच्या कामाची आयुक्तांनी केली पाहणी

**ठाणे (यश सावंत) :** ठाणे महापालिकेच्या राम गणेश गडकरी रंगायतन या नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यात आले आहे. कंत्राटदाराने हे काम विहित मुदतीत पूर्ण करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. ही वास्तू लवकरात लवकर रसिक आणि नाट्यकर्मी यांच्यासाठी खुली व्हावी, अशी अपेक्षाही आयुक्त राव यांनी व्यक्त केली.

सन १९७८मध्ये बांधण्यात आलेल्या रंगायतनची १९९८मध्ये प्रथम मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता २६ वर्षांनी नुतनीकरण होत आहे. ऑक्टोबर महिन्यात नुतनीकरणाचे काम सुरू झाले असून ९० दिवसांच्या अवधीत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. या कामाच्या सद्यस्थितीची पाहणी आयुक्त राव यांनी बुधवारी सायंकाळी केली. त्यावेळी, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त उमेश बिरारी, उपनगर अभियंता विकास ढोले व शुभांगी केसवानी, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी उपस्थित होते.

गडकरी रंगायतनमधील सुधारणा करताना रंगायतनचे पारंपरिकपण जपले जाणार आहे. तसेच, काळानुरुप अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. कलाकार आणि रसिक या दोघांनाही सुखद अनुभव मिळेल, हा उद्देश नजरेसमोर ठेवून रंगायतनचे नूतनीकरण केले जात आहे.

नुतनीकरणात प्रामुख्याने, मुख्य वास्तूचे मजबुतीकरण, तालीम हॉलचे नुतनीकरण, मुख्य प्रेक्षागृहातील संपूर्ण आसनव्यवस्था







बदलणे, रंगकर्मी यांच्यासाठी असलेल्या ग्रीन रूममध्ये आवश्यक सुधारणा, रंगमंच-फ्लोरिंग अद्ययावत करणे, वातानुकूलन यंत्रणेत सुधारणा, शौचालयांचे संपूर्ण अद्यावतीकरण आदी कामांचा समावेश आहे. नाट्यकर्मींशी चर्चा करून या कामांची रुपरेषा ठरवण्यात आली आहे.

आयुक्त राव यांनी मुख्य रंगमंच, प्रेक्षागृह, प्रवेशद्वार यांच्या कामाची पाहणी केली. रंगायतनचे प्रवेशद्वाराची आधुनिक पद्धतीने रचना करावी, अशी सूचना राव यांनी केली. तसेच, आसनव्यवस्था करताना प्रेक्षकांची सोय लक्षात घेऊन निवड केली जावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. ध्वनी यंत्रणा, वातानुकूलन यंत्रणेची व्यवस्थित तपासणी करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. मुख्य वास्तूच्या सुशोभीकरणासोबतच वास्तूच्या बाहेर असलेला भागही सुशोभित करण्यात यावा. त्यावर योग्य पद्धतीची विद्युत रोषणाई केली जावी, असेही आयुक्त राव म्हणाले.

# धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' या महानायकाच्या गाथेचा भव्य ट्रेलर प्रदर्शित


संदीप रघुनाथ मोहिते-पाटील प्रस्तुत आणि उर्विता प्रोडक्शन निर्मित बहुचर्चित, महाराष्ट्राचा महासिनेमा 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर रसिकांच्या भेटीला आला आहे. नुकताच या चित्रपटाचा दिमाखदार ट्रेलर लॉंच सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचा शुभारंभ चित्रपटातील 'राजं संभाजी' या गाण्याच्या नृत्याने झाला. मावळ्यांच्या या उत्स्फूर्त सादरीकरणाने एक चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. हा भव्य चित्रपट हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार असून, छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय शौर्याचा आणि त्यागाचा सन्मान करणारा आहे. हा चित्रपट म्हणजे महाराष्ट्राचा महासिनेमा आहे.



चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांना भव्यदिव्य स्वरूपात मांडण्यात आले आहे. त्यांच्या शौर्यपूर्ण नेतृत्वाने हिंदवी स्वराज्याचे संरक्षण केले, तसेच धर्माच्या रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचे अत्यंत प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. छत्रपती संभाजी महाराजांची ही शौर्यगाथा या चित्रपटात अनुभवयाला मिळणार आहे.

या चित्रपटात ठाकूर अनुप सिंग, अमृता खानविलकर, किशोरी शहाणे, भार्गवी चिरमुले, मल्हार मोहिते-पाटील, संजय खापरे, पल्लवी वैद्य, कमलेश सावंत, विनीत शर्मा, प्रदीप रावत, प्रदीप कब्रा, राज जुत्शी प्रमुख भूमिकेत पाहायला मिळतील. ट्रेलर पाहाता या सर्व कलाकारांनी भूमिकांना सर्वोत्तम न्याय दिला आहे.संदीप रघुनाथ मोहिते-पाटील प्रस्तुत, आणि उर्विता प्रोडक्शन निर्मित या चित्रपटाची निर्मिती शेखर रघुनाथराव मोहिते-पाटील, धर्मेंद्र सुभाष बोरा, सौजन्य सूर्यकांत निकम आणि केतनराजे निलेशराव भोसले यांनी केली आहे.

## कलर्स मराठीवरील 'जय जय स्वामी समर्थ' मालिकेचे १३०० भाग पूर्ण



कलर्स मराठी वरील जय जय स्वामी समर्थ या मालिकेला संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर जगभरात रसिक प्रेक्षकांचे उदंड प्रेम लाभत आहे. अन्यायाला मोडीत काढत आणि मार्गातल्या असंख्य लोकांचा उध्दार करत, त्यांना उपदेश करत स्वामी समर्थ कसे सोलापूर येथील अक्कलकोट येथे पोहचले... कशी लोकांना त्यांच्या महानतेची प्रचिती येत गेली, अक्कलकोट येथील चोळप्पा महाराज, सेवेकरी सुंदराबाई, अक्कलकोटचे राजे मालोजीराव, या भक्तांनी स्वामीलीला अनुभवली आणि ते कसे कृतार्थ झाले, त्यांचे कसे नाते होते आणि या भक्तिमार्गात आणखी कोणकोणती माणसं श्री स्वामी समर्थांच्या कृपाछायेखाली आली हे सगळं प्रेक्षकांना या मालिकेमध्ये आजवर बघायला मिळाले. अक्कलकोट येथे स्वामींच्या वास्तव्याने वटवृक्षाखाली दोन दशके चैतन्य ऊर्जा नांदली ती कशी हे देखील प्रेक्षकांना रोजच्या रोज अनुभवता येत आहे. 'जय जय स्वामी समर्थ' या मालिकेने यशाचा एक नवीन विक्रम स्थापित केला आहे. मालिकेने १३०० भागांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार करून प्रेक्षकांच्या मनात एक अढळ स्थान निर्माण केले आहे. स्वामी समर्थांच्या जीवनातील दिव्य कथा, त्यांच्या अलौकिक चमत्कारिक कार्यांचा प्रवास आणि त्यांच्या उपदेशांनी भरलेले अनेक प्रसंग यामुळे ही मालिका महाराष्ट्रातील घराघरात लोकप्रिय झाली आहे. या यशाच्या निमित्ताने मालिकेतील कलाकारांनी आणि तंत्रज्ञांनी एकत्र येऊन हा आनंद साजरा केला. तसेच, प्रेक्षकांचे आभार मानले, ज्यांच्या प्रेमामुळे ही मालिका सतत नवीन शिखरे गाठत आहे. स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने आणि प्रेक्षकांच्या प्रेमाने ही मालिका आणखी दीर्घकाळ प्रेक्षकांचे मनोरंजन करत राहील, असा विश्वास आहे.

## सन मराठी' वरील 'तुझी माझी जमली जोडी' व 'तिकळी' मालिकाच्या वेळेत बदल




'सन मराठी' वाहिनीवरील प्रत्येक मालिकेवर तुम्ही भरभरून प्रेम करत आहात. तुमच्या आवडत्या मलिकांपैकी 'तुझी माझी जमली जोडी' व 'तिकळी' या मालिकांची कथा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. पण आता ११ नोव्हेंबर पासून या मालिका नव्या वेळेत प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.' तुझी माझी जमली जोडी' ही मालिका सोम. ते शनि.रात्री १० वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

सध्या मालिका एका रंजक वळणावर आली असून मालिकेत सई देवांशच्या जन्माच रहस्य शोधण्याचा निर्धार करते. देवांशच्या जन्माच रहस्य समजताच मालिकेत येणार रंजक वळण. तर 'तिकळी' ही मालिका सोम. ते शनि.रात्री १०.३० वाजता तुमच्या भेटीला येणार आहे. सध्या मालिकेत वेद व नली यांच्यातील दुरावा पाहत आहोत. पण आता वेद- नलीच्या नात्यात वाहणार प्रेमाचे वारे. सुरू होणार वेद- नलीचा सुखाचा संसार. वेदसमोर नली तिचं प्रेम व्यक्त करू शकेल? वेद - नलीला बाबाराव एकत्र येऊन देतील? आता मालिकेत नक्की काय घडणार हे जाणून घेण्यासाठी नव्या वेळेत ११ नोव्हेंबरपासून पाहा 'तुझी माझी जमली जोडी' सोम. ते शनि.रात्री १० वा. आणि 'तिकळी' सोम. ते शनि.रात्री १०:३० वा. फक्त सन मराठीवर.

## "जीभेवर व्हेज, मनात नॉनव्हेज...", अमेय वाघसाठी सिद्धार्थ चांदेकरची खास पोस्ट

अभिनेता अमेय वाघ याने मराठीबरोबरच हिंदी मनोरंजन सृष्टीत देखील त्याने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्याचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. बुधवारी अमेय वाघने आपला ३७ वा वाढदिवस साजरा केला. यावेळी मराठी सिनेसृष्टीतील कलाकार मंडळी आणि चाहत्यांनी त्याच्यावर भरभरून शुभेच्छाचा वर्षाव केला. सिद्धार्थ चांदेकरनेदेखील आपल्या खास मित्राला अगदी हटके पद्धतीने शुभेच्छा दिल्या.

सिद्धार्थ चांदेकर यांने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. अमेयसोबतचा एक



गोड फोटो शेअर करत कॅप्शनमध्ये त्याने लिहलं, "जीभेवर व्हेज, मनात नॉनव्हेज संघटनेचे अध्यक्ष, ओंकार अनंताचे जावई, महागातली कॉफी पिणारे आणि सतत १ ते ३० आकडे मोजायला लावणारे अमेय वाघ...तुम्हाला वाढदिवसाच्या Excuse Me शुभेच्छा".

अमेय आणि सिद्धार्थच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर दोघे लवकरच एकत्र 'फसक्लास दाभाडे' चित्रपटात झळकणार आहेत. सिद्धार्थ आणि अमेयने बालकलाकार म्हणून त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात केली होती. छोट्या पडद्यापासून ते मोठा पडदा असा त्यांचा प्रवास राहिला. दोघांनीही मराठी चित्रपटसृष्टीत एकाहून एक हिट चित्रपट दिले आहेत.

## हिवाळ्यामध्ये रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी बनवा गाजर आणि आल्याचा सूप

हिवाळयात सर्दी, फ्लू होण्याची शक्यता जास्त असते. परंतु आज आम्ही तुमच्यासाठी रोगप्रतिकार शक्ती वाढवणऱ्या सूपची रेसिपी घेऊन आलोय. यामुळे तुम्ही सर्दी आणि इतर संसर्गजन्य आजारापासून दूर राहू शकता.

हिवळयामध्ये थंडीपासून बचाव करण्यासाठी गरम पेय फायदेशीर असतात. असाच एक पदार्थ आहे जो थंडीपासून तुमचं बचाव करू शकतो. तो पदार्थ म्हणजे सूप. हे केवळ स्वादिष्टच नसून आरोग्यासाठी उत्तम पेय आहे. आपण विविध प्रकारचे सूप तयार करतो. परंतु थंडीच्या दिवसांमध्ये गाजर आणि आल्यापासून तयार केलेलं सूप आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. गाजर आणि आलं हे दोन्ही जीनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध आहे. गाजरात बीटा कॅरोटीन असते. तसंच गाजरामध्ये व्हिटॅमिन अ मुबलक प्रमाणात असते. जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी फादेशीर आहे. तसंच आल्यामध्ये जिंजरॉल असते. जे एक



शक्तीशाली अँटीऑक्सिडेंट आहे.

तज्ञांच्या मते, गाजर आणि आलं दोन्ही रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याचे काम करते. यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटी-ऑक्सिडंट शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि अनेक प्रकारच्या आजारांपासून संरक्षण करते.

**गाजर आणि आल्याचा सूप तयार करण्यासाठी लागणारे साहित्य**

४-५ गाजर (किसलेले)
१ इंच आलं (चिरलेला)
१ कांदा (चिरलेला)
२-३लसूण पाकळया (बारीक चिरून)
१ टीस्पून तेल
१/२ टीस्पून जिरे
१/४ टीस्पून हळद पावडर
१/२ टीस्पून धने पावडर
१/४ टीस्पून लाल तिखट
चवीनुसार मीठ
४ कप पाणी
बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती**

सर्वप्रथम एक कढई घ्या. त्यात तेल गरम करा. गरम तेलामध्ये जिरं टाका. नतंर कांदा आणि लसून घाला आणि लालसर होईपर्यंत परता.

आता यात किसलेले गाजर आणि आलं घालून २-३ मिनिटं परतून घ्या.

या मिश्रणात हळद, धनेपूड, मिरची पावडर, आणि मीठ घालून चांगलं मिक्स करा.

आता एका पातील्यात ४ कप पाणी घाला आणि बॉईल होवू द्या.

यात तयार केलेल गाजर आणि आल्याचं मिश्रण घाला. हे मिश्रण १५ ते २० मिनिटं मंद आचेवर उकळू द्या.

नंतर गॅस बंद करून मिश्रण थंड होऊ द्या. आता हे मिश्रण मिक्सरमधून बारीक करून गुळगुळीत करुन घ्या.

पॅनमध्ये थोडं लोणी आणि मिरेपुड कोथिंबीर घालून गरम सर्व करा.

या सूपमध्ये तुम्ही तुमच्या आवडीनुसार इतर भाज्या घालू शकता.

जर तुम्हाला सूप मलाईदार बनवायचं असेल तर त्यात थोडे क्रीम किंवा दूध घालू शकता.

**गाजर आणि आलं सूप पिण्याचे फायदे**

पोषणतज्ञांच्या मते, आल्यामध्ये टी-ऑक्सिडंट असतात जे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात.

आलं पचनक्रिया सुधारण्यास मदत करते तसंच गॅस आणि बद्धकोष्ठतेच्या समस्या दूर करते.

गाजरात व्हिटॅमिन अ असते. जे त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करते.

गाजरामध्ये असलेले व्हिटॅमिन ए डोळ्यांसाठी देखील चांगलं आहे.

या सूपमध्ये कॅलरीज कमी असल्यानं वजन कमी करण्यास उपयुक्त आहे.

## भाजीला चव देण्यासाठीच नाही तर, आरोग्यासाठी फायदेशीर आहे कोथिंबीर

आपल्याकडे जवळपास प्रत्येक भाजीत कोथिंबीर असतेच असते. कोथिंबीरीमुळे अन्नाला चव येते. मात्र, तुम्हाला माहिती आहे का? की, अन्नाला चव प्रदान करण्याव्यतिरिक्त कोथिंबीर आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. कोथिंबीरमध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन ए, बी, के, कॅल्शियम, प्रोटीन, या सारखे पोषक घटक पुरेशा प्रमाणात आढळतात. तसंच अँटिऑक्सिडट्स, क्षयरोग विरोधी अनेक गुणधर्म आढळतात. कोथिंबीरचं पाणी प्यायल्यास पचकक्रिया सुधारते. त्याचबरोबर कोलेस्ट्रॉल, रक्तदाब आणि वजन कमी करण्यासाठी कोथिंबीरचे पाणी उपयुक्त आहे.

**कोथिंबीर पाण्याचे फायदे**

**वजन कमी :** वजन कमी करण्यासाठी कोथिंबीर फायदेशीर आहे. झटपट वजन



कमी करण्याऱ्यांनी त्यांच्या आहारामध्ये कोथिंबीर पाण्याचा समावेश करणे गरजंच आहे. कोथिंबीर पाण्यानं चरबी जलद बर्न होते.

**रोगप्रतिकार शक्ती वाढते :** कोथिंबीरच्या रसामध्ये शरीराला व्हिटॅमिन ए, बी, सी आणि के प्राप्त होते. यामुळे रोगप्रतिकार शक्ती बुस्ट होते. शिवाय कोथिंबीरीमुळे माणूस अनेक आजारांपासून दूर राहतो. अतिरीक्त परिणामासाठी दिवसातून दोन वेळा कोथिंबीर पाणी प्या. यामुळे वजन झपाट्यानं कमी होईल.

**शरीरातील विषारी घटक बाहेर :** शरीरातील विषारी घटक बाहेर न गेल्यास अनेक आजार उद्भवतात. किडनीमधील घाण आणि विषारी पदार्ध बाहेर टाकायचे असतील तर कोथिंबीरचे रस फायदेशीर आहे.

**त्वचेसाठी फायदेशीर :** कोथिंबीरच्या पाण्यात जीवाणूवाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म आहेत. तसंच यात आढळणाऱ्या दाहक विरोधी गुणधर्मांमुळे त्वचेसंबंधित समस्या दूर होतात. तसंच चेहऱ्यावरील मुरुम देखील कमी होण्यास कोथिंबीर पाणी फायदेशीर आहे.

कोथिंबीर रसाचं नियमित सेवन केल्यास निद्रानाशाचा समस्या दूर होतात. परिणामी झोपेची गुणवत्ता सुधारते.

कोलेस्ट्रॉल आणि उच्चरक्तदाब कमी करण्यासाठी कोथिंबीर पाणी उपयुक्त आहे.

पचनक्रिया सुरळीत होण्यासाठी तसंच गॅस आणि अपचन सारख्या समस्या दूर करण्यासाठी कोथिंबीर पाणी फायदेशीर आहे.

संधिवात आणि स्नायूसंबंधित दुखण्यावर कोथिंबीर रस चांगलं माणलं जाते.

## राशी भविष्य




**मेष** – विरोधात गेलेले लोक मैत्री करण्यास येतील. प्रेमाला चालना मिळेल. घरातील समस्या सोडवाल. कामाचा ताण वाढेल.

**वृषभ** – संसारात क्षुल्लक तणाव होईल. धंद्यात वाढ होईल. नोकरीत वरिष्ठांना खूश करता येईल. वसुली करण्यात संयम ठेवा.

**मिथुन** – धंद्यात मोठे काम मिळेल. नवीन ओळखी होतील. कला-क्रीडा स्पर्धेत चमकाल. नोकरी मिळेल. वादविवाद टाळावेत.

**कर्क** – नोकरीच्या ठिकाणी क्षुल्लक तणाव होईल. काम करण्यात चूक होऊ शकते. सौम्य शब्दांत बोला. जोडीदाराची साथ मिळेल.

**सिंह** – स्थावर मालमत्तेचे व्यवहार सावधपणे करावेत. मान-प्रतिष्ठा वाढवणारी घटना घडेल. स्पर्धा जिंकाल. धंद्यात मोठे काम मिळेल.

**कन्या** – नोकरीमध्ये मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. सर्वांचे सहकार्य लाभेल. वरिष्ठांचा तुमच्यावर दबाव राहील.

**तूळ** – अडचणीत आलेले काम पूर्ण करा. वाहन, घर खरेदीचा विचार कराल. नवीन ओळखी होतील. वाहन जपून चालवा.

**वृश्चिक** – घरगुती कामे करून घ्या. वेळेला महत्त्व द्या. प्रतिष्ठा मिळेल. धंद्यातील चर्चा करताना आपल्या रागावर ताबा ठेवा.

**धनु** – तुमच्या कार्याला योग्य दिशा देता येईल. कोर्टाच्या कामात यश मिळेल. धंद्यात वाढ होईल. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**मकर** – आर्थिक उलाढाल जपून करावी. योग्य निर्णय घेता येईल. कठीण काम करून घेता येईल. धंद्यातील समस्या सोडवाल.

**कुंभ** – कार्यक्षेत्रात तुमचा प्रभाव वाढेल. आप्तेष्ट भेटतील. धंद्यात मोठे काम मिळेल. वसुली करा. स्पर्धा जिंकाल. मनमानी करू नये.

**मीन** – आर्थिक नियोजन उत्तम राहील. दूरच्या प्रवासाचे योग येतील. वरिष्ठांच्या मनाविरुद्ध बोलू नका. चर्चा करताना तारतम्य ठेवा.

# निवडणुकीमुळे राज्यातील शाळांना तीन दिवस सुटी? शिक्षण विभागाच्या सूचना काय?

**पुणे (अभिजित येरल्लू) :** राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या अनुषंगाने १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे शाळा भरवणे शक्य नसल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना दिले आहेत.



राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेतील कामकाज आणि प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेत शिक्षकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. तसेच अनेक मतदान केंद्रेही शाळांमध्ये असतात. मतदानासाठीची तयारी करण्यासाठी निवडणूक प्रशासन शाळा ताब्यात घेते. या पार्श्वभूमीवर १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शाळांना सुटी देण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तालयाने शिक्षण विभागाला सादर केला होता. या अनुषंगाने शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रकाद्वारे शिक्षण आयुक्तांना निर्देश दिले आहेत. राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणे शक्य नसेल, त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत आयुक्त स्तरावरून आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, असे नमूद करण्यात आले आहे.

शाळांतील बहुसंख्य शिक्षकांना निवडणुकीच्या काम करावे लागत असल्याने शाळेत शैक्षणिक कामकाज होऊ शकत नाही. तसेच काही ठिकाणी शाळांमध्ये मतदान केंद्र असते. त्यामुळे त्या ठिकाणीही पूर्वतयारी करावी लागते. ही बाब लक्षात घेता शाळा बंद ठेवाव्या लागू शकतात. त्यामुळे शाळांना सुटी देण्याचा निर्णय योग्य ठरतो. या संदर्भात शाळा व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासन यांनी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेणे उचित ठरेल.

# सूर्यकिरणे अंबाबाईच्या मुखकमलावर, किरणोत्सव सात दिवसांचा असण्याची शक्यता

**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण) :** करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या किरणोत्सवात बुधवारी मावळतीची सूर्यकिरणे अंबाबाईच्या मुखकमलापर्यंत येऊन पोहोचली. किरणोत्सवाचा ठरलेला कालावधी संपल्यानंतर सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत गेल्याने अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव सोहळा सात दिवसांचा असावा, असे मत पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे यांनी व्यक्त केले.



नाईकवाडे म्हणाले, मंदिरात दि. ९ ते ११ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या दक्षिणायन किरणोत्सव सोहळयाच्या पार्श्वभूमीवर समिती आणि विवेकानंद महाविद्यालयाच्या खगोलशास्त्र विभागातर्फे दि. ७ व ८ तसेच दि. १२ आणि १३ रोजी सूर्यकिरणांचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये दि. ७ आणि १३ रोजी सूर्यकिरणे प्रखरतेने मूर्तीच्या मुखापर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.

बुधवारी सायंकाळी ५:४८ पर्यंत सूर्यकिरणांनी अंबाबाईच्या मुखकमलांवर सोनेरी अभिषेक केला. यावरून पूर्वीच्या काळी हा सोहळा नक्कीच सात दिवसांचा होत असणार. मात्र काळानुसार सूर्यकिरणांच्या मार्गात मानवी अडथळे निर्माण झाले असावेत. त्यामुळे सूर्यकिरणे थेटपणे मूर्तीवर पोहोचण्यास अडचण येत असावी. परिणामी सोहळा तीन दिवसांचा झाला.

## SPORT

# BCCI advised to rope in Sachin Tendulkar for India vs Australia Tests to revive Virat Kohli, Rohit Sharma's fortunes

**New Delhi -** Former Indian cricketer WV Raman, on Thursday, advised the Board of Control for Cricket in India (BCCI) to rope in India batting legend Sachin Tendulkar for the impending Border-Gavaskar Trophy series and revive Virat Kohli and Rohit Sharma's batting fortunes.

India's batting came under fire following the whitewash at home against New Zealand earlier this month. The batting line-up's vulnerability against spin was exposed as 37 wickets fell to New Zealand spinners across three Test matches.

Kohli and Rohit's performance in the series was particularly criticised after they managed just 93 and 91 runs, respectively, recording one of their worst-ever shows in a home series.

With India's next assignment up against Australia, were batting will play a key role in deciding the result of the series, Raman took to social media to float the idea of having Sachin in the Indian dressing room as a batting consultant, which could work immensely in favour of Kohli and Rohit, who are possibly touring



Australia for the final time in their career.

He tweeted: "I think that #TeamIndia could benefit if they have the services of #Tendulkar as the batting consultant in their prep for the #BGT2025. Enough time between now and the 2nd test. Roping in consultants is rather common these days. Worth a thought?"

One of Kohli's major blips in his illustrious career came almost 10 years back when he travelled to England for the first time in his career. After reaching the highs on home turf, Kohli was ready to reign on one of the toughest conditions in world cricket, but the 25-year-old returned with a run tally of just 134 runs across 10 innings, which left his career at stake.

Recalling what he described as "the lowest point" of his career, Kohli recalled how Sachin had come to his aid to script a turnaround.

"My hip position was an issue during that England tour," Kohli told Mayank Agarwal on bcci.tv in 2020. "If the right hip opens or closes too much you, you are in trouble. [You have to] keep that hip position nice and side-on and balanced so that you can play through both off side and leg side with equal control is very very important.

"I came back from England and spoke to Sachin paaji and had a few sessions with him in Mumbai. I told him that I am working on my hip position. He made me realise the importance of big stride, a forward press against fast bowlers. The moment I started doing that with my hip alignment, things started falling in place nicely and then the Australia tour happened."

Kohli had bounced back from the England low to script an unforgettable campaign in Australia, which eventually redefined his career as a world-class batter. He scored 692 runs at 86.50 with four centuries in as many Tests, his best-ever show in an away series.

# Sunil Gavaskar opens up on hilarious rivalry with Allan Border: He calls me bunny

**New Delhi -** Former India cricketer Sunil Gavaskar recently opened up on his hilarious rivalry with legendary Australia captain Allan Border. Notably, the trophy for the Test series played between India and Australia is named after the two legendary cricketers.

The silverware was christened 'Border Gavaskar Trophy' in 1996 ahead of the one-off Test between the sides in 1996.

With India and Australia all set to ignite their intense rivalry in the upcoming series,Gavaskar recalled his hilarious conversations with Border. The former batter revealed how the Australian legend keeps on pulling his leg about dismissing him in a Test every time he sees him.



"Well, because he's (Border) got me out, that's the problem. You see, he's got me out. I never got a chance to bowl to him. If I got a chance to bowl to him and get him out it might have been different. But you know he's a little, you know, things that you know, used to come in and do this and bowl. And can you imagine he got one ball to turn, and I played that down the wrong line, top edge and I was out," Gavaskar told 7 Cricket.

Border has a total of four wickets against India and one of them is Gavaskar whom he dismissed during the 6th Test in Mumbai in November 1979.

"So you know, I am reminded of it every time I bump into him. He comes and says 'Hello Bunny, how are you?' What do I say to that?," he added.

Gavaskar retired as the highest run scorer in the history of Test cricket with 10, 122 runs to his name and was also the first player to score 10000 runs in the format. However, his record was broken by Allan Border in February 1993. The Australian captain retired with 11,174 runs from 156 matches which was later surpassed by Brian Lara.

Meanwhile, India and Australia will be seen locking horns in a five-match Test series beginning from November 22 in Perth. The series holds tremendous importance for both teams as it could decide their qualification to the World Test Championship (WTC) final 2025.

# Sania Mirza named Sports Ambassador of THIS city, not Delhi,

**New Delhi -** Former Indian tennis star Sania Mirza is known for her impressive skills. She is a six-time Grand Slam champion and former women's doubles number one.

The 37-year-old retired from the game in February 2023 with a professional career of around 20 years. Now the Indian tennis icon has been named a sports ambassador for Dubai by the Dubai Sports Council. Besides her, former cricketer Harbhajan Singh was also named the sports ambassador for the city.

The announcement was made at the 'Dubai Sports Retreat' held on Monday at the futuristic Museum of the Future, organised by the Dubai Sports Council. Mirza also expressed her honour at the appointment. 'Being named a Dubai Sports Ambassador is a tremendous privilege,' she said. 'Dubai has been my home for years, and I am thrilled to help bring people together through sport and celebrate the city's rich sporting culture.' Her appointment as sports ambassador came just days ahead of her 38th birthday, which she will celebrate on November 15.



The tennis star also shares the news on her Instagram handle with several pictures from the event. "Honored and grateful to be a sports ambassador for Dubai," she captioned the post. Check her post here.

# Virat Kohli's vulnerability exposed as Sanjay Manjrekar reveals how Australia will target India star



Former India cricketer Sanjay Manjrekar revealed the strategies the Australian bowlers might use against Virat Kohli in the upcoming Border-Gavaskar Trophy (BGT) 2024-25. Sanjay Manjrekar said that the Australian bowlers would likely bowl outside Virat Kohli's off-stump during the five-match Test series.

Virat Kohli has started preparing in the nets for the first Test against Australia in Perth. India is low on confidence after being whitewashed by New Zealand in their recent home Test series. The loss dented their chances of reaching the ICC World Test Championship (WTC) final for the third consecutive cycle.

Speaking on Star Sports, Sanjay Manjrekar said that Australian pacers will likely start by bowling outside the off-stump deliveries. Manjrekar also said that Australians might try to cramp him for room and attack his body, similar to New Zealand. He added that Kohli is well aware of these strategies.

"Virat knows exactly what's going to be planned. They'll start with that line outside the off-stump and gauge what his mood is. These days he looks to leave balls outside the off-stump and if they have anything that is pitched right up, he will look to drive," Manjrekar said.

"Nowadays, they are also trying to cramp him for room and attack his body because he loves to get forward so much. So that is something New Zealand tried, which is very smart. And then if he is so focused outside off, that typical one of landing a ball on the middle stump which Josh Hazlewood would try. So all those methods will be tried by the Australians. And Virat Kohli is aware of that," he added.

Kohli hasn't performed as per expectations in the ongoing calendar year. He has averaged just 22.72 in six Tests this year, which is one of the lowest of his career. The right-handed batter scored only 93 runs in six innings during India's recent humiliating 0-3 whitewash against New Zealand at home.

However, the 36-year-old batter has a good record against Australia in Tests, with 2,042 runs in 25 matches at an average of 47.48, including five half-centuries and eight centuries. Kohli has an even better record in Australia, scoring 1,352 runs at an average of 54.08, with six centuries and four fifties.

Virat Kohli has played two matches at Perth, the venue for the first Test. In 2012, he scored 44 and 75 in two innings.

# नक्षल्यांच्या हालचालींवर ड्रोनची करडी नजर, सीमेवर जवान अलर्ट मोडवर

● गडचिरोली , सुचिता देशमुख :

नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील गडचिरोलीत विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलिस दलातील सी-६० हे विशेष पथक सज्ज झाले आहे. एकीकडे प्रभावी नक्षलविरोधी मोहीम, दुसरीकडे आत्मसमर्पण यामुळे नक्षल चळवळीला एकामागून एक धक्के बसत आहेत. मात्र, निवडणूक काळात कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी नक्षल्यांच्या प्रत्येक हालचालीवर अत्याधुनिक ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे लक्ष ठेवण्यात येत आहे.

लोकसभा निवडणुकीत एका मतदान केंद्रावरील हल्ल्याचा प्रयत्न हा एकमेव अपवादवगळता शांततेत मतदान झाले. निवडणुकीपूर्वीच नक्षल्यांचे मनसुबे उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले होते.



आता विधानसभा निवडणुकाही शांततेत व सुरक्षित वातावरणात व्हाव्यात, याकरिता पोलिस दलाकडून व्यूहरचना आखली जात आहे. छत्तीसगड व तेलंगणा सीमेवर १४ ठिकाणी आंतरराज्य तपासणी नाके सुरू केली असून, परराज्यातून येणाऱ्या व गडचिरोलीतून तिकडे जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. पोलिसांकडे १३० अत्याधुनिक ड्रोन कॅमेरे असून त्याचा वापर केला जात आहे. जिल्हाभरात १७ हजार सुरक्षा जवानांची कुमक निवडणुकीसाठी तैनात राहणार आहे. कायदा सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

■ "लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणूकही सुरक्षित वातावरणात पार पडेल. छत्तीसगड सीमेवर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. सी-६० या जवानांमार्फत नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येत आहे. जनतेने कोणाच्याही दबावाला बळी न पडता मतदानाचा हक्क बजवावा."

**- नीलोत्पल, पोलिस अधीक्षक**

३० जहाल माओवाद्यांनी सन २०२२ पासून आतापर्यंत आत्मसमर्पण केले आहे. हिंसक चळवळीत असलेल्यांचे मनपरिवर्तन करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोलिसांचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, जिल्हा अतिसंवेदनशील व नक्षलप्रभावित असतानाही सुदैवाने आतापर्यंत एकही अनुचित घटना घडलेली नाही. १५ ऑक्टोबरला विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली. तेव्हापासून आतापर्यंत कायदा - सुव्यवस्थेला बाधा पोहोचेल, असा एकही गुन्हा नोंद झालेला नाही. यासाठी पोलिसांचे सुक्ष्म नियोजन कामी आले आहे.

आचारसंहिता कालावधीत ७ गुन्हे दाखल झाले होते. नक्षल्यांनी सुरक्षा जवानांवर हल्ला केला होता. यात चौघे जखमी झाले होते. सुरक्षेचा नियमित आढावा

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत. याशिवाय गुप्तचर यंत्रणेकडूनही माहिती घेतली जात आहे. केंद्रीय सुरक्षा दलासह राज्याच्या सुरक्षा यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्चायतन माडचिरोली पोलिसांकडून सतत आढावा घेतला जात आहे.

# ४ दिवसांत १ हजार ११५ मतदारांनी केले घरून मतदान




● नाशिक, सचिन कदम :

महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ८५ वर्षावरील वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांना गृहमतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यात २ हजार १४४ ज्येष्ठ तर २३ हजार ३४१ दिव्यांग मतदारांपैकी २ हजार ३२७ जणांचे अर्ज स्वीकारण्यात आले. आतापर्यंत १५ विधानसभा मतदारसंघात वयोवृद्ध व दिव्यांग, असे मिळून १११५ एवढ्या मतदारांनी गृहमतदानाचा हक्क बजावला. त्यात १६१ दिव्यांग मतदारांनीही मतदानाचा हक्क बजावला आहे.

नाशिक पूर्व मतदारसंघातील गृहमतदानाच्या प्रक्रियेस बुधवारी सकाळी सुरुवात झाली. भारत निवडणूक आयोगाने मतदानाची प्रक्रिया अधिकाधिक सुलभ व्हावी म्हणून विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसारच ८५ वर्षांवरील वयोवृद्ध मतदार आणि दिव्यांग (४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्व) अशा मतदारांना गृहमतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जलज शर्मा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक जिल्ह्यातील १५ मतदारसंघांत ५४ हजार ६९९ जणांना १२ 'ड' अर्जाचे वितरण करण्यात आले होते. त्यापैकी २ हजार १४४ जणांकडून प्रतिसाद मिळाला होता, तर २ हजार १३० अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. बाकीच्यांनी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करण्यास प्राधान्य दिले आहे.

गृहमतदानाची प्रक्रिया म्हणजे एक प्रकारचे मतदान केंद्रच असते. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या पेट्या मतमोजणीच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्श- नाखाली उघडल्या जातात.



## वाळू काढताना पाण्यात बुडून एकाचा मृत्यू

● सांगली, विशाल पाटील :

नेवरी (ता. कडेगांव) येथील येरळा नदी पात्रातून यारीच्या साह्याने वाळू उपसा करताना वांगी येथील हनुमंत पोपट सूर्यवंशी (वय ४०) यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. कडेगाव पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे. हणंमत सुर्यवशी हे मिळेल तो रोजगार करुन कुटुंब चालत होते. नेवरी येथील बाळू चव्हाण हे येरळा नदीपत्रातील वाळू काढून त्याची विक्री करण्याचा व्यवसाय करतात. नदीत वाळू काढण्यासाठी यारी बसवली आहे. ती चालवण्याचे काम मच्छिंद्र मोहिते व मयत हनुमंत सूर्यवंशी करायचे.

सोमवारी (दि.१२) सायंकाळच्या सुमारास दोघे यारीला रस्सी बांधण्याचे काम करत होते. त्यावेळी हनुमंत सुर्यवशी हे नदीपत्रात पाण्यात बुडाले. त्याला मच्छिंद्र व बाळू चव्हाण यांनी पाण्याबाहेर काढून कडेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. असता डॉक्टरने त्यांना मृत घोषित केले. सदर घटनेची तक्रार आनंदराव भानदास सूर्यवंशी यांनी कडेगाव पोलिसात दिलीअसून कडेगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत.

हनुमंत यांच्या मृत्यूमुळे त्यांचे कुटुंब उघड्यावर पडले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे. काही दिवसांपूर्वी त्यांच्या मुलाचा अपघात झाला होता. सर्व कुटुंबाची जबाबदारी हनुमंत यांच्यावर होती.

# हमीभाव धान विक्री नोंदणी अडचणीत; ॲप काम करेना

● भंडारा, भावना जैन :

यंदा विधानसभा निवडणुकांमुळे शासनाने हमीभाव धान नोंदणी, उचल व भरडाईची मंजुरी एकाचवेळी दिली. यंदा जिल्ह्यात हमीभाव धान खरेदी केंद्रावर धान विक्री नोंदणीला नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरुवात झाली आहे. परंतु, नोंदणीचे ॲप काम करीत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. परिणामी, शेतकऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. धान विक्री नोंदणीची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर असल्याने या मुदतीत वाढ करण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.



जिल्ह्यात अनेक हमीभाव केंद्रांवर नोंदणीचे ॲप काम करीत नसल्याने शेतकऱ्यांना शेती कामे सोडून नोंदणीसाठी ताटकळत उभे राहावे लागत आहे. सध्या धान कापणी व मळणीची कामे जोमात आहेत. असे असताना हमीभाव केंद्रांवर धानाची विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीची प्रक्रिया ऑनलाइन आहे. यासाठी स्वतंत्र ॲप तयार करण्यात आले आहे. यावर्षी ॲपमध्ये बरेच बदल करण्यात आले आहेत. केंद्र चालकांना बरीच माहिती व कागदपत्रे अपलोड करावी लागत आहेत. यासाठी शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर उपस्थित राहावे लागत आहे.

नोंदणीसाठी लागतात सरासरी २० मिनिटे

धान विक्री नोंदणीचे ॲप काम करीत नसल्याने नोंदणी प्रक्रियेला बराच वेळ लागत आहे. एका शेतकऱ्याच्या नोंदणीसाठी सरासरी २० मिनिटांपेक्षा अधिक कालावधी लागत आहे. दिवसभरात जास्तीत ३० ते ४० शेतकऱ्यांचीच नोंदणी होत आहे. मात्र, केंद्रावर दरदिवशी शेकडो शेतकरी दाखल होते आहेत. गर्दी टाळण्यासाठी शेतकऱ्यांना अर्ज स्वीकारल्यानंतर टोकन क्रमांक दिला जात आहे.

■ "जिल्ह्यात धान विक्रीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. परंतु, अनेक केंद्रांवरील ॲप काम करीत नाही. त्यामुळे प्रक्रियेला विलंब लागत आहे. यावर उपाय म्हणून शासनाने नोंदणीची मुदत वाढविणे गरजेचे आहे."

**- आकाश गायधने, शेतकरी, मोहाडी**

शासनाच्या लाभासाठी नोंदणी गरजेची

शेतकऱ्यांचा होणारा त्रास वाचविण्यासाठी नोंदणी केंद्र चालकांकडून टोकन देत दोन ते चार दिवसांनंतर केंद्रावर नोंदणीसाठी येण्याचा सल्ला दिला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तीन ते चार चकरा माराव्या लागतात. शेतकऱ्यांना शासनाच्या अनुदानाचा अथवा बोनसचा लाभ मिळण्यासाठी नोंदणी आवश्यक असते.

गतवर्षीही मिळाली होती मुदतवाढ

यंदा हमीभाव धान विक्री नोंदणीसाठी अंतिम दि. १५ नोव्हेंबरपर्यंत आहे. त्यामुळे मुदतीत नोंदणीसाठी शेतकरी गर्दी करत आहेत. मात्र, जोपर्यंत दिलेले उद्दिष्ट पूर्ण होत नाही, तोपर्यंत मुदतवाढ दिली जाणार आहे. गतवर्षीही फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मिळाली होती.

व्यापाऱ्यांकडून होतेय शेतकऱ्यांची लूट

धान विक्रीसाठी नोंदणीची प्रक्रिया आटोपल्यानंतर धान खरेदीला प्रारंभ होणार आहे. परंतु, पैशाची गरज भागविण्यासाठी शेतकरी व्यापाऱ्यांच्या चक्रव्यूहात फसताना दिसत आहेत. व्यापाऱ्यांकडून कमी दरात धानाची खरेदी केली जात आहे.

# मुंबईत प्लास्टिकच्या डब्यात तुकडे करून टाकलेल्या मृतदेहाचे गूढ उकलले

● मुंबई, यश सावंत :

मुंबईतील गोराई येथे प्लास्टिकच्या डब्यामध्ये तुकडे करून टाकलेल्या मृतदेहाची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे. या मृत व्यक्तीचे नाव रघुनंदन पासवान (वय २१) असे असून, तो बिहारचा रहिवासी आहे. प्रेमसंबंधाला असलेल्या विरोधातून ही हत्या झाल्याचा संशय असून, पोलिसांनी याप्रकरणी मुलीच्या भावाला बुधवारी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दरभंगा जिल्ह्यातील कान्होली गावचा रहिवासी असलेला वर्षभरापूर्वी रघुनंदन बिहारच्या एका रुग्णालयात काम करत होता. तेथे एका १७ वर्षीय मुलीला काही औषधे देऊन त्याने मदत केली. त्यावरून दोघांमध्ये मैत्री झाली आणि ती प्रेमसंबंधात बदलली. मात्र, मुलीच्या घरच्यांना ही बाब समजल्यानंतर तिच्या भावाने रघुनंदनला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावर गावातील प्रमुखाने मुलीच्या कुटुंबीयांशी बोलून सदर प्रकरण मिटवले. त्यानंतर या मुलीला तिचे भाऊ मुंबईत घेऊन आले; परंतु रघुनंदन तिला संपर्क करत राहिला. यामुळे तिचे कुटुंबीय संतप्त झाले आणि त्यातच त्यांनी रघुनंदनची भाईंदरमध्ये हत्या केली. हत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह गोराईमध्ये आणून झुडुपांत फेकून देण्यात आला. प्लास्टिकच्या डब्यामध्ये या मृतदेहाचे तुकडे करून टाकण्यात आले होते.



हा प्रकार पोलिसांच्या रविवारी निदर्शनास आला. त्यानंतर तपासाची चक्र सुरू करून मृतदेहाची ओळख पटवण्यात आली, तसेच या गुन्ह्यात ज्या ऑटोरिक्षाचा वापर करण्यात आला, त्याच्या चालकाला ताब्यात घेण्यात आले. त्याची सध्या पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. दरम्यान, गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी मुलीच्या दोन भावांपैकी एकाला पकडले असून इतरांचा शोध सुरू आहे. दरम्यान, हत्येआधी रघुनंदन त्याची प्रेयसी आणि तिच्या कुटुंबीयांच्या संपर्कात होता, असा दावा जितेंद्र पासवान यांनी केला.

रघुनंदन हा गेल्या आठ महिन्यांपासून पुण्याच्या एका कंपनीत काम करत होता. दिवाळीच्या सुट्टीत तो घरी गेला होता. मात्र, ३१ ऑक्टोबरला मित्रांसोबत मुंबईला जात असल्याचे सांगून तो घरातून निघून गेला. त्यानंतर त्याचा फोन बंद होता. त्याच्याशी संपर्क होऊ न शकल्याने वडील पुण्याला गेले. त्याच्या मोबाइलचे शेवटचे लोकेशन अंधेरी असल्याचे समजताच त्यांनी अंधेरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. मुलीच्या भावांनी रघुनंदनला पुण्याला बोलावले. त्यानंतर मुंबईच्या दौऱ्यावर नेण्याच्या नावाखाली अंधेरीला आणत नशेचे औषध देऊन त्याची हत्या केली, असा आरोप जितेंद्र पासवान यांनी केला.

# जळगावात गरोदर महिलेला घेऊन जाणाऱ्या ॲम्बुलन्समध्ये ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट



● जळगाव, नितीन देवळेकर

धरणगाव येथून गरोदर महिलेला घेऊन येणाऱ्या १०८ या ॲम्बुलन्समधील ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाला. त्यात वाहनाच्या चिंधड्या होऊन त्याचे अवशेष दीडशे फूट उंच उडाले. तर तब्बल ५०० मीटर अंतरापर्यंत या स्फोटाचे हादरे बसले. चालकाच्या समयसूचकतेमुळे ॲम्बुलन्समधील रुग्ण, त्याचे नातेवाईक, डॉक्टरचे प्राण वाचले आहेत. अग्निशमन दलाच्या दोन बंबाद्वारे आग विझविण्यात आली. ही घटना बुधवारी रात्री ९:१५ ते ९:३० वाजेच्या दरम्यान महामार्गावरील गुजराल पेट्रोल पंपाच्या पुलावर घडली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, धरणगाव येथून एम.एच.१४ सी.एल.०७९६ ही १०८ ॲम्बुलन्स गरोदर महिलेला घेऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात येत असताना महामार्गावरील गुजराल पेट्रोल पंपाच्या उड्डाणपुलाजवळ गियर बदल करीत असताना आगीची ठिणगी उडाली. काही तरी गडबड असल्याचा अंदाज आल्याने चालक राहूल बाविस्कर याने वाहन रस्त्याच्या बाजूला घेतले. वाहनातील डॉ.रफिक अन्सारी, रुग्ण, व नातेवाईक या सर्वांना खाली उतरविले. त्याचवेळी मागून येणाऱ्या दुसऱ्या ॲम्बुलन्समध्ये बसवून त्यांना रुग्णालयात रवाना केले. हे वाहन काही अंतरावर पुढे सरकताच ॲम्बुलन्समधील ऑक्सिजन सिलिंडरचा जोरात स्फोट झाला. क्षणातच वाहनाच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या. आगीच्या ज्वाला आणि सिलिंडर दीडशे फूट उंचापर्यंत उडाले. फुटलेले सिलिंडर रस्त्याच्या दुसऱ्या कडेला तर रिकामे असलेले सिलिंडर वाहनाजवळ पडले. पुलाच्या खाली वाहनाचा पत्रा उडाला.

स्फोट व आगीचे दृश्य इतके भयंकर होते की बघणाऱ्यांचाही थरकाप उडत होता. आवाजामुळे निमखेडी शिवारापर्यंत भूकंपासारखे धक्के बसले. यामुळे झोपलेले वृध्द लोकही जागे झाले.

# लहान मुलांचे बालपण हरवू न देता त्यांना संवेदनशील करणे हे आव्हानात्मक - महापालिका आयुक्त सौरभराव

● ठाणे, सम्यक कासारे :

बाल लैंगिक शोषण ही जागतिक समस्या आहे. त्यामुळे जेवढे लवकर शक्य असेल तेवढे लवकर बालकांना सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श याची माहिती होणे आवश्यक आहे. हा अतिशय संवेदनशील विषय असून बालकांच्या मनात कोणतीही दहशत निर्माण न करता, त्यांचे बालपण हरवणार नाही, अशा पद्धतीने त्यांना या वास्तवाबाबत संवेदनशील बनवण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर आहे, असे प्रतिपादन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

बाल दिनाचे औचित्य साधून गुरूवारी महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे 'बाल सुरक्षा जनजागृती सप्ताहा'चे उद्घाटन करण्यात आले. ठाणे महापालिका, ठाणे परिवहन सेवा, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि अर्पण ही सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बालकांचे लैंगिक शोषण करणाऱ्यांना धाक निर्माण व्हावा, तसेच, बालकांच्या हक्कांविषयी जागृती निर्माण व्हावी हा या सप्ताहाच्या आयोजनाचा उद्देश आहे.

**■ बाल सुरक्षा जनजागृती सप्ताहाचे उद्‌घाटन**

**■ टीएमटीच्या बसगाड्यांमध्ये होणार बालकांच्या सुरक्षेबाबत जागृती**








ठाणे महापालिका परिवहन सेवेच्या सर्व बसगाड्यांमध्ये याबाबतचा संदेश प्रसारित केला जाणार आहे. तर, १० बस गाड्यांमध्ये बाह्य जाहिरातींच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे. या बसचे उद्घाटनही यावेळी महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधिश इश्वर सूर्यवंशी तसेच बालकांच्या हस्ते महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. महापालिकेच्या शाळांमध्ये सुमारे ४० हजार विद्यार्थी शिकत आहेत. त्यांच्या शैक्षणिक जबाबदारीसोबतच सुरक्षेचे दायित्वही महापालिकेवर आहे. त्यामुळे ही जनजागृती मोहिम अतिशय महत्त्वाची आहे. त्यात बालकांसोबतच शिक्षक वर्गाचेही प्रबोधन केले जात आहे. त्यामुळे हा अतिशय संवेदनशील विषय त्यांना योग्य प्रकारे हाताळता येईल, असा विश्वास महापालिका आयुक्त राव यांनी व्यक्त केला. याप्रसंगी, जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायाधीश इश्वर सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त अनघा कदम, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी महेंद्र गायकवाड, अर्पण या संस्थेच्या पूजा टापरिया उपस्थित होते.